वीज, पाणी प्रश्नावर सिडकोवर धडक

गव्हाण, हेटवणेसह परिसरातील समस्यांवर यशस्वी चर्चा

पनवेल : प्रतिनिधी

अनियमित होणारा विजपुरवठा आणि पाणी प्रश्नासह परिसरातील विविध समस्यांसदर्भात आमदार प्रशांत ठाकूर आणि कामगार नेते महेंद्र घरत यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने सिडको कार्यालयावर मंगळवारी (दि. २२) धडक दिली. सिडकोचे यवस्थापकीय संचालक संजय भाटीया आणि सहव्यवस्थापकीय संचालिका राधा मॅडम यांच्याशी चर्चा करुन ग्रामीण भागाला भेडसावणाऱ्या विविध समस्यांवर या वेळी यशस्वी चर्चा झाली.

गव्हाण, घरतअळी, कोपर, शिवाजीनगर, न्हावा, न्हावाखाडी गाव या परिसराला मराविमच्या माध्यमातून पनवेल येथून अनियमित वीजपुरवठा होत असतो. त्यामुळे या परिसरातील ग्रामस्थ त्रस्त झाले आहेत. संतप्त ग्रामस्थांनी आज आमदार प्रशात ठाकूर व झुंजार नेते महेंद्र घरत यांच्या नेतृत्वाखाली सिडको भवनाला धडक दिली. या वेळी सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक संजय भाटीया, सहव्यवस्थापकीय संचालिका राधा मॅडम यांच्यासह सिडकोचे प्रमुख अधिकारी यांच्यासोबत बैठक झाली.

गव्हाण, घरतआळी, शिवाजीनगर, न्हावा, न्हावाखाडी या गावांना नोडलमधून वीजपुरवठा करण्याची मागणी करण्यात आली. सद्यस्थितीत या गावांना १७ किमी अंतरावरून म्हणजेच पनवेल येथून होत असलेला वीजपुरवठा सतत खंडित होत असतो. तसेच ५० वर्षांपूर्वीची टाकलेली लाईन सडलेली आहे त्यामुळे वीज पुरवठ्यात सातत्याने व्यत्यय येत असतो.

२१ व्या शतकातील शहरे वसविणाऱ्या सिडको प्रशासनाने सुंदर स्वप्न दाखवित आमची जमीन अत्यल्प किंमतीत घेऊन कोट्यवधीच्या भावाने इतरांना विकत आहे. विकसित नोडमध्ये स्वच्छ पाणी आणि २४ तास वीजपुरवठा; मात्र प्रकल्पग्रस्तांना गढूळ पाणी आणि लोडशेडींग आणि डेंग्यू, मलेरियाचा फैलाव हे आम्ही सहन करणार नाही. तातडीने उलवे विकसित नोडमधून आम्हाला विद्युत पुरवठा करा, अशी मागणी या वेळी संतप्त ग्रामस्थांनी केली. चर्चेअंती सिडको एम. डी. श्री. भाटिया यांनी तातडीने मुख्य अभियंता श्री. वरखेडकर यांना राज्य विद्युत मंडळाबरोबर आजच्या आज चर्चा करून विद्युतपुरवठा नियमित करा, असा आदेश दिला. तसेच दुसरे मुख्य अभियंता हेटवणेचे एक्स्पर्ट श्री. चौधरी यांना आदेश देऊन नवीन पाणीपुरवठा योजना तयार करून शेलघर कोपर, शिवाजीनगर, न्हावा, न्हावाखाडी गावांना शुद्ध पाणीपुरवठा करण्याचे आदेश दिले. तसेच जावळे, बामणडोंगरी, कोपर गावातील २००७ पूर्वीच्या घरांना सिडकोने भूसंपादनाच्या नोटीसा बजावल्या आहेत. यासाठी मेट्रो सेंटरवर महेंद्र घरत यांच्या नेतृत्वाखाली मोर्चा काढण्यात आला होता. त्या संदर्भात रहात्या घरांच्या नोटिसा रद्द करण्यात येतील, असे आश्वासन सिडको व्यवस्थापकीय संचालकांनी दिले. वहाळ ग्रामपंचायतीच्या कारभाऱ्यांनी रहिवासी दाखले न देता प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना भरावाच्या कामापासून वंचित ठेवण्याचे काम केले. यासंदर्भात फोटो आणि ओळखपत्र व सर्कलचे पत्र घेऊन त्यांना कामामध्ये सामाविण्याचे आश्वासनही सिडकोने दिले.

या वेळी आमदार प्रशांत ठाकूर, कामगारनेते महेंद्र घरत, पंडित म्हात्रे, ए. डी. नाईक, जयवंत देशमुख, भाऊशेठ पाटील, किरण देशमुख, शेखर देशमुख, सुनील कोळी, सदा नाईक, भरत नाईक आदी हजर होते.